| MHSO030101022024 | दाखल दिनांक | : | १७/०८/२०२० |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | ०७/१२/२०२४ |
| | निकाल दिनांक | : | ०५/०८/२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | | ०५ ११ १९ |

**सोलापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (लोहमार्ग न्यायालय), सोलापूर जि. सोलापूर यांच्या न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी – दिपक गो. कंखरे )**

न्यायनिर्णय घोषित दिनांक ०५ ऑगस्ट, २०२६
गुन्हा नोंद क्र. २७९/२०१९, लोहमार्ग पोलीस स्टेशन, सोलापूर

**(नियमित फौजदारी खटला क्र.१६६२/२०२४)** **निशाणी क्र.२८**
**(जुना नियमित फौजदारी खटला क्र.१०५/२०२०)**

| | |
|---|---|
| **फिर्यादी/तक्रारदार** | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस स्टेशन अधिकारी,<br>लोहमार्ग पोलीस स्टेशन, सोलापूर. |
| **अभियोग पक्षातर्फे** | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एस. मांजरे.** |
| | **... विरुद्ध ...** |
| **आरोपी** | **आकाश तुकाराम बेरुनगी,**<br>वय – २५ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>राहणार : शास्त्री नगर, सोलापूर. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | विधीज्ञ श्री. वाय.आर.माटूर. |

**भाग 'ब'**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ११/१२/२०१९ |
| फिर्याद दाखल दिनांक | : | ११/१२/२०१९ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | १७/०८/२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | : | ०३/०६/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | २६/०६/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | : | ०५/०८/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | : | ०५/०८/२०२६ |

**आरोपीचा तपशिल**

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीन तारीख | गुन्ह्याचे विवरण | न्यायनिर्णयाचा संक्षित तपशील | आरोपीस देण्यात आलेल्या शिक्षेचा तपशील | सेट ऑफचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **आकाश तुकाराम बेरुनगी** | ११/१२/२०१९ | १२/१२/२०१९ | भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे | दोषी | न्यायालय बसेपर्यंतची शिक्षा व रु.५००/- द्रव्यदंड | -- |

**भाग 'क'**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचावपक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

## अ. अभियोग पक्ष –

| सा.क्र. | नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | सय्यद रसुल गयबु | साक्षीदार | १९ |
| २. | विजय भिमाशंकर गोरे | साक्षीदार | २४ |
| ३. | जयचंद्र सुर्यभान कदम | साक्षीदार | २५ |

## क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २० | जप्ती पंचनामा |

**अ. अभियोग पक्षामार्फत –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
| --- | --- | --- |
| –– | –– | –– |

**ब. बचाव पक्षामार्फत –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
| --- | --- | --- |
| – | – | –– |

## भाग–ड
## आवश्यक मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्र. | मुद्देमालाचे वर्णन |
| --- | --- | --- |
| १ | –– | REALME कंपनीचा मोबाईल |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०५/०८/२०२६ रोजी घोषित केले)

सरकार पक्षाने आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम ३७९ अन्वये खटला दाखल केला आहे.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. फिर्यादी मेहबूब हुसेनसाब शेख हे दिनांक ११/१२/२०१९ रोजी १४.१५ वाजताच्या सुमारास सोलापूर ते गुलबर्गा जाण्याकरीता तिकीट खिडकी समोर तिकीट काढणेकरीता सोलापूर रेल्वे स्टेशन येथे रांगेमध्ये उभे असताना प्रवासी लोकांच्या गर्दीमध्ये खिशात ठेवलेला मोबाईल कोणीतरी चोरला. त्यामुळे ते तक्रार देण्याकरीता आले असताना आरोपी आकाश तुकाराम बेरुनगी याने गर्दीचा

फायदा घेऊन फिर्यादी यांचा मोबाईल त्यांच्या संमतीशिवाय मुद्दाम लबाडीने चोरुन नेल्याचे त्यांना समजले. सबब त्यांनी लोहमार्ग पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

३. सोलापूर लोहमार्ग पोलीसांनी गु.र.क्र.२७९/२०१९ अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ नुसार गुन्हा नोंद केला. तपास अधिकारी श्री.जे.एस.कदम, पोलीस हवालदार यांनी आरोपीस सदर गुन्ह्यात अटक केली. त्यानंतर तपास अधिकारी यांनी साक्षीदारांचे बयान नोंदविले व तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने प्रस्तुत आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ अन्वये निशाणी क्र.१५ वर दोषारोप निश्चित करण्यात आले. आरोपीला सदर दोषारोप त्याच्या मातृभाषेत समजावुन सांगणेत आले असता त्याने गुन्हा मान्य नसल्याचे नमूद करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब निशाणी क्र.२६ वर नोंदविण्यात आला. त्यामध्ये आरोपीने त्याचेविरुद्ध खोटे प्रकरण दाखल करण्यात आल्याचा बचाव घेतला. आरोपीतर्फे कोणताही साक्षीदार तपासण्यात आला नाही.

६. अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती पी.एस.मांजरे यांनी युक्तिवाद केला की, साक्षीदारांच्या कथनांमध्ये कोणतीही तफावत नाही. त्यामुळे आरोपीने गुन्हा केल्याचे संशयापलिकडे शाबित झाले आहे. तसेच आरोपीने त्याच्या

उलटतपासामध्ये कोणताही सबळ असा पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे आरोपीने जप्त मुद्देमाल फिर्यादी यांच्या संमतीविना चोरी केल्याचे अभिलेखावरील कागदपत्रांवरुन व साक्षीपुराव्यावरुन स्पष्टपणे शाबित होते. त्यामुळे आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली. याउलट आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाने संशयापलिकडे जाऊन आरोपीवरील दोषारोप सिद्ध केलेले नाहीत, त्यामुळे आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात यावी अशी विनंती केली.

७. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावे बघता माझे विचारार्थ खालील मुद्दे निघतात. त्यांची उत्तरे मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे दिली आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १. | अभियोगपक्ष असे सिद्ध करतो काय की, दिनांक ११/१२/२०१९ रोजी १४.१५ वाजताच्या सुमारास फिर्यादी सोलापूर रेल्वे स्टेशनवरील तिकीट खिडकी समोर तिकीट काढणेकरीता रांगेमध्ये उभे असताना आरोपीने फिर्यादी यांचा अंदाजे रु.५,९९९/– किमतीचा रिअलमी कंपनीचा मोबाईल त्यांच्या ताब्यातून त्यांच्या संमतीशिवाय मुद्दाम लबाडीने चोरुन नेला व त्याअन्वये भारतीय दंड संहिताचे कलम ३७९ प्रमाणे गुन्हा केला? | ...होकारार्थी. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीता –**

८. अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवलेले आरोप सिद्ध करण्याकरीता एकूण ३ साक्षीदार तपासलेले आहेत.

९. साक्षीदार क्र.१ सय्यद यांच्या साक्षीत आले आहे की, दिनांक ११/१२/२०१९ रोजी ते सीपीडीएस ड्युटीवर आरपीएफ ठाणा, सोलापूर येथे कार्यरत होते. सदर दिवशी रेल्वे स्टेशनवर बुकिंग ऑफिसजवळ गस्त करीत असताना त्यांना एक संदिग्ध व्यक्ती मोबाईल चोरी करुन पळून जात असताना दिसला. त्यांनी त्याचा पाठलाग करुन त्याला पकडले. त्याला आरपीएफ ठाणा, सोलापूर येथे आणून त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव आकाश तुकाराम बैरुणगी असे सांगितले. त्याची अधिक चौकशी केली असता त्याने मोबाईल चोरुन पळून जात असल्याची कबूली दिली. त्यानंतर त्यांनी आरोपीला मुद्देमालासह लोहमार्ग पोलीस, सोलापूर यांना सुपूर्द केला. आरोपीजवळून एक रिअलमी कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला होता. जप्ती पंचनामा त्यांच्यासमक्ष करण्यात आला होता. जप्ती पंचनामा निशाणी क्र.२० वर असून त्यावर त्यांची सही आहे आणि त्यातील मजकूर बरोबर आहे. ज्या आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली होती त्याला पाहिल्यास ते ओळखू शकतात. आरोपी न्यायालयात हजर नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तरे नोंदविली आहेत.

१०. साक्षीदार क्र.२ सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय भिमाशंकर गोरे

यांच्या साक्षीत आले आहे की, दिनांक ११/१२/२०१९ रोजी त्यांची नेमणूक सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाणे येथे होती व सदर दिवशी सोलापूर रेल्वे स्टेशन येथे मोबाईल चोरी झाल्याबाबतची माहिती ठाणे अंमलदार यांनी दिली होती. त्यानुसार सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाणे येथे आले असता त्याठिकाणी आरपीएफ पोलीसांनी एका इसमाला मोबाईलसह लोहमार्ग पोलीस ठाणे येथे घेऊन आले होते. ठाणे अंमलदार यांनी फिर्याद नोंदविली होती. आरोपीचे नाव आकाश बैरुणगी असे होते. ठाणे अंमलदार यांनी दोन पंचासमक्ष आरोपीकडून रु.१६,०००/– किमतीचा रिअलमी कंपनीचा मोबाईल जप्त केला होता. तपासादरम्यान तिकिट बुर्कींग सेंटरजवळ प्रवाशांच्या झोपेचा फायदा घेवून जप्त मुद्देमाल चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलीसांनी त्यांचा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला. आरोपी व जप्त मुद्देमाल पाहिल्यास ओळखू शकत असल्याचे व आरोपी न्यायालयात हजर नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तरे नोंदविली आहेत.

११. साक्षीदार क्र.३ जयचंद्र सुर्यभान कदम यांच्या साक्षीत आले आहे की, दिनांक ११/१२/२०१९ रोजी सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार म्हणून ते कार्यरत होते. गु.र.नं.२७९/२०१९ तपासकामी त्यांच्याकडे प्राप्त झाला होता. सदर गुन्ह्यामध्ये आरपीएफ सोलापूर यांनी आरोपी व मोबाईल पुढील कारवाईसाठी सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाणे यांच्याकडे पाठविली होती. आरोपीने प्रवासी प्रतिक्षालय, सोलापूर रेल्वे स्टेशन येथे झोपले असता त्यांचा झोपेचा फायदा घेवून रेडमी कंपनीचा काळ्या रंगाचा अंदाजे रु.५,९९९/–

किमतीचा मोबाईल चोरी केल्याची माहिती त्यांना आरपीएफ पोलीसांनी दिली होती. तपासादरम्यान त्यांच्याकडे जप्त मुद्देमाल, मुद्देमाल पावती, फिर्याद व इतर कागदपत्रे दिली होती. दोन पंचासमक्ष चव्हाण यांनी जप्ती पंचनामा केला होता. त्याचदिवशी आरोपीला अटक करुन पंचासमक्ष चव्हाण यांनी अटक पंचनामा तयार केला होता. आरोपीने तपासादरम्यान प्रतिक्षालय, सोलापूर रेल्वे स्टेशन येथे प्रवाशांच्या झोपेचा फायदा घेवून जप्त मुद्देमाल चोरी केल्याची कबुली दिली होती. तपासादरम्यान ५ साक्षीदारांचे तपासटिपणी नोंदविले. सदर गुन्ह्यात आरोपीने सोलापूर रेल्वे स्टेशन येथे जप्त मुद्देमाल चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. जप्त मुद्देमाल व आरोपीस पाहिल्यास ओळखू शकत असल्याचे व आरोपी न्यायालयात हजर नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तरे नोंदविली आहेत.

१२. दाखल कागदपत्रे व पुराव्याचे अवलोकन केले. सदरील प्रकरणात साक्षीदारांच्या पुराव्याचे ओहापोह करण्याआधी नमूद करणे गरजेचे आहे की, आरोपीमार्फत मूळ फिर्यादी शेख महबूब हुसेनसाब यांचा जबाब मान्य करण्यात आलेला आहे. सदरील जबाब निशाणी क्र.२१ वर दाखल आहे. सदरील जबाबावरुन स्पष्ट दिसते की, फिर्यादीचा मोबाईल सोलापूर रेल्वे स्टेशनवरुन आरोपी आकाश याने चोरलेला होता. त्यालाच दुजोरा देत साक्षीदार क्र.१ जप्ती पंच यांनी चोरी झालेला मोबाईल आरोपीच्या ताब्यातून जप्त केल्याचे स्पष्टपणे कथन केलेले आहे. त्यामुळे, निशाणी क्र.२० वरील जप्ती पंचनामा हा भारतीय साक्ष अधिनियमानुसार शाबित झालेला आहे.

१३. साक्षीदार क्र.१ ते ३ यांच्या पुराव्यावरुन स्पष्ट होते की, फिर्यादीचा वर नमूद मोबाईल सोलापूर रेल्वे स्टेशनवरुन चोरी झाला होता. तसेच, तो चोरी झाल्यापश्चात तात्काळ आरोपीच्या ताब्यात मिळून आलेला होता. सदरील मोबाईल हा न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीला देखील परत करण्यात आलेला आहे. त्यामुळे, स्पष्ट होते की, फिर्यादीचा चोरी झालेला मोबाईलच आरोपीच्या ताब्यात मिळून आलेला होता. तसेच, साक्षीदार क्र.१ ते ३ यांच्या उलटतपासात असा कुठलाही बचाव आला नाही की, त्यामुळे आरोपीने गुन्हा केलेला नाही, असा संशय निर्माण होईल.

१४. वरील सर्व पुराव्यावरुन सर्व संशयापलीकडे शाबित होते की, आरोपीने फिर्यादी यांचा अंदाजे रु.५,९९९/– किमतीचा रिअलमी कंपनीचा काळ्या रंगाचा मोबाईल फोन चोरी केलेला होता. म्हणून पटलावरील तोंडी, लेखी पुराव्यावरुन हे सिध्द होते की, आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ प्रमाणे गुन्हा केलेला आहे व तो शिक्षेस पात्र आहे. म्हणून न्यायालय आरोपीच्या शिक्षेवर युक्तीवादाकरीता कामकाज थांबवित आहे.

DIPAK GOKUL KANKHARE
Digitally signed by DIPAK GOKUL KANKHARE
Date: 2026.08.05 18:06:54 +0530

ठिकाण – सोलापूर.
दिनांक – ०५/०८/२०२६

(**दिपक गो. कंखरे**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(रेल्वे न्यायालय) व (कोर्ट नं.०२),
सोलापूर.

१५. सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, सदरील गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. त्यामुळे, आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी.

आरोपीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, आरोपीचा हा प्रथम गुन्हा आहे. तो कुटुंबाचा कर्ता पुरुष आहे. त्याच्या कुटुंबाची पूर्ण जबाबदारी त्याच्यावर आहे. त्याला दोन लहान मुले व पत्नी आहे. त्याला तुरुंगात टाकल्यास त्याच्या पत्नी व मुलांचे उपजीविका चालविणे कठीण होईल. तसेच, आरोपी हा ३३ वर्षांचा तरुण आहे. म्हणून त्याला कमीत कमी शिक्षा द्यावी.

१६.        सदरील प्रकरणातील सर्व गोष्टींचा विचार केला असता असे दिसते की, पुराव्यावरुन असे दिसते की, तसेच, आरोपीने फिर्यादी यांचा अंदाजे रु.५,९९९/- किमतीचा रिअलमी कंपनीचा काळ्या रंगाचा मोबाईल फोन चोरलेला आहे. सदरील बाब समाजासाठी धक्कादायक स्वरुपाची आहे. अशा परिस्थितीत आरोपीला परिविक्षाधीन कायद्या १९९८ चा फायदा देणे न्यायालयाला उचित वाटत नाही. परंतु, आरोपी हा तरुण असल्याने त्याला तुरुंगात पाठविल्यास तो पुन्हा कठोर गुन्हेगार बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, तो मजूरीचे काम करीत असल्याचे न्यायालयासमोर सांगत आहे. यावरुन स्पष्ट होते की, त्याला तुरुंगात टाकल्यास त्याचे कुटूंब गंभीर उपासमारीला सामोरे जाण्याची शक्यता आहे. तसेच, आरोपी न्यायालयात हात जोडून त्याच्या हातून घडलेल्या गुन्ह्याबाबत पश्चाताप व्यक्त करीत आहे. त्याच्या नजरेत पश्चाताप जाणवत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करुन तसेच प्रकरणातील मुद्देमाल व आरोपीच्या वयाचा व त्याच्या कुटुंबातील सदस्यांचा विचार करुन आरोपीला न्यायालय बसेपर्यंतची शिक्षा देणे न्यायोचित ठरेल. म्हणून मुद्दा क्र.०१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.०२ च्या उत्तरात पुढील अंतिम आदेश खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :

# <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी **आकाश तुकाराम बेरुनगी** याची भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ शिक्षेस पात्र गुन्ह्याकरिता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७१(२) अन्वये दोषी ठरवुन त्याला **न्यायालय बसेपर्यंतची शिक्षा आणि रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) इतक्या द्रव्यदंडाची, आणि द्रव्यदंड न भरल्यास पुढील ०२ महिने साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.** |
| २. | गुन्ह्यात जप्त मुद्देमाल एक रिअलमी कंपनीचा काळ्या रंगाचा मोबाईल न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीच्या ताब्यात परत करण्यात आला असुन अपिल कालावधी संपल्यानंतर त्याचा ताबा फिर्यादीकडे कायम करण्यात यावा. |
| ३. | आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ४. | निकालाची प्रत आरोपी यास विनामुल्य देण्यात यावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला. ) |

DIPAK GOKUL KANKHARE

Digitally signed by DIPAK GOKUL KANKHARE
Date: 2026.08.05 18:07:11 +0530

( **दिपक गो. कंखरे** )

दिनांक : ०५/०८/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(रेल्वे न्यायालय) व (कोर्ट नं.०२),
सोलापूर.

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per original Judgment. | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. A.S.Magnur (Grade-III) |
| Court | : | 3rd Jt.Civil Judge J.D. & J.M.F.C., (Court No.2) Solapur. |
| Judgment/Order Declared On | : | 05.08.2026 |
| Judgment/ Order singed on | : | 05.08.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 05.08.2026 |